MHKO050002592020

## विशेष दिवाणी दावा क्र. ७/२०२० मधील नि.५९ वरील आदेश

(निता चंदुरे वि. मोहन धुमाळ )

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा कब्जा, हक्कज्ञापन व मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ यांचे कडून रजिस्टर दस्त नं. १०७२/२०१९ च्या खरेदीपत्रान्वये मिळकत खरेदी घेतली असल्याची माहिती वादी यांना जुन, २०२५ मध्ये समजुन आली. प्रतिवादी यांनी केलेले तथाकथित खरेदीपत्र हे दावा पुर्व आहे. सदरची बाब प्रतिवादींनी कैफीयत मध्ये नमुद न करता लपवुन ठेवली आहे. त्यामुळे, वादीस सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. वादीने अर्जात नमुद केले प्रमाणे दावा कलम ७ नंतर ७–अ मधील मजकुर लिहिणेस तसेच दावा कलम १०, ११ व १५ मध्ये त्या अनुषंगाने दुरुस्ती करणेची मागणी केली आहे. सदरचे दुरुस्ती मुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही. त्यामुळे, अर्जात नमुद केले प्रमाणे दाव्यामध्ये सदरची दुरुस्ती करुन मागितलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेऊन आपले म्हणणे नि.क्र. ६० कडे दाखल केले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, नोंदणीकृत खरेदीपत्राची

माहिती वादीला सन २०२५ मध्ये समजुन आली हे वादीचे कथन चुकीचे आहे. खरेदीपत्राचा इंडेक्स पब्लीक कागदपत्र असल्याने वादीस तसा बचाव घेता येणार नाही. खरेदीपत्राचा दस्त हा दिनांक १३.६.२०१९ रोजीचा आहे. त्यामुळे, कोणताही समाधानकारक खुलासा न करता वादीला सहा वर्षानंतर अशा स्वरुपाची दाद मागता येणार नाही. वादीने मागणी केलेली दुरुस्ती मुदतीत नाही. दावा मिळकतीबाबत या पूर्वी रे.क.नं. ३८०/२०१५ चा दावा काढुन टाकणेत आला आहे. ती बाब वादीने लपवुन ठेवली आहे. वादीने इचलकरंजी नगरभुमापन क्र. ३७ बाबत संगनमताने खोटे रेकॉर्ड तयार करुन फेरफार नं. ४९१ करुन घेतला आहे. त्याबाबतचे अपील भुमी अभिलेख यांचे कडे प्रलंबित आहे. सदरचा दावा पुराव्यावर असताना वादीने दिलेला अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

४. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलाकेन केले. वादीने कब्जा, हक्कज्ञापन व मनाई मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केला आहे. वादीने शहापूर येथील सि.स.नं. ३७ बाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीमध्ये वादींना २/३ हिस्सा आहे असे वादीचे कथन आहे. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी ने दिनांक १३.६.२०१९ रोजीचे प्रतिवादी नं.१ व २ यांचे झालेले खरेदीपत्र कोर्टापासुन लपवुन ठेवले आहे. सदरचे खरेदीपत्र सि.स.नं. ३७ चे आहे. वाद मिळकत देखील सि.स.नं. ३७ असल्याने सदरचे खरेदीपत्र हे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदर दाव्याचे कामी मुद्दे काढले असले तरी देखील अद्याप पुरावा सुरु झालेला नाही. अशा परिस्थितीत वादी व प्रतिवादी यांचेतील वाद कायमस्वरुपी संपुष्टात येणेकरिता आणि वादांची पुर्नरावृत्ती टाळणेकरिता वादी मागत असलेली दुरुस्ती मंजुर केलेस

प्रतिवादींना काहीही त्रासाचे होणार नाही. उलट, सदरची दुरुस्ती ही अंतिम न्यायनिर्णयास मदत करणारी आहे. सदरचे दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. वादीने सदरचा अर्ज विलंबाने का दिला याबाबतचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जामध्ये नमुद केलेले नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज वादी यांचेवर खर्च देवविणेच्या अटीवर मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने या अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३००/– प्रतिवादीनां द्यावेत.

३. वादीने सदर आदेशापासून १४ दिवसाचे आत अगर पुढील नेमले तारखेस दाव्यात दुरूस्ती करून तशी दुरूस्ती दावा प्रत दाखल करावी.

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2026.02.20 13:06:08 +0530

इचलकरंजी.
दिनांक – १८.०२.२०२६.

**(जी.एम. नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.